दैनिक
राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | सोमवार, दि. ९ नोव्हेंबर २०२६ | वर्ष - २ | अंक - ४५ | पाने - ४ | पुणे/पिंपरी-चिंचवड

ईडी म्हणजे कायद्याचा बाप नव्हे!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली / विशेष वृत्त:

देशात एखाद्या विरोधी पक्षाच्या नेत्यामागे ईडीचा ससेमिरा लागला की राजकीय वर्तुळात खळबळ उडते. छापे, समन्स, चौकशी आणि अटकेच्या कारवायांनी राजकारण तापते. मात्र, तपास यंत्रणांच्या या अधिकारांना कायद्याची मर्यादा आहे, याची आठवण कर्नाटक उच्च न्यायालयाने करून दिली आहे. 'ईडी ही काही सुपर कॉप नाही की, तिच्या निदर्शनास येणाऱ्या प्रत्येक गोष्टीचा तपास सुरू करेल!' अशा स्पष्ट शब्दांत न्यायालयाने अंमलबजावणी संचालनालयाला सुनावले आहे. म्हणजेच तपास यंत्रणा आहे म्हणून वाटेल तिथे, वाटेल तसा तपास करण्याचा परवाना मिळत नाही, हा न्यायालयाचा संदेश आहे.

काँग्रेस नेते के. वाय. नांजे गौडा यांच्याशी संबंधित कथित जमीन वाटप घोटाळ्याच्या प्रकरणात ईडीची कारवाई रद्द करताना न्यायमूर्ती एम. आय. अरुण यांनी ही महत्त्वपूर्ण निरीक्षणे नोंदवली.

नेमके प्रकरण काय होते? गौडा हे कर्नाटकातील मालूर येथील भू-अनुदान समितीचे अध्यक्ष होते. त्यांनी समितीच्या अन्य सदस्यांसोबत आपल्या पदाचा गैरवापर करून सुमारे ८० एकर सरकारी जमीन ३८ व्यक्तींना बेकायदेशीरपणे वाटल्याचा आरोप करण्यात आला होता. याच कथित गैरव्यवहाराच्या आधारे ईडीने मनी लाँडरिंगचा तपास सुरू केला.

जानेवारी २०२४ मध्ये ईडीने तब्बल १४ ठिकाणी छापे टाकले. या कारवाईत २७ लाख रुपयांपेक्षा अधिक रोख रक्कम आणि ५० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या जंगम व स्थावर मालमत्तेशी संबंधित कागदपत्रे जप्त केल्याचा दावा तपास यंत्रणेने केला होता. एवढेच नाही, तर या प्रकरणाच्या अनुषंगाने ईडीने विशेष न्यायालयात खासगी



तक्रारही दाखल केली होती.

मात्र, या प्रकरणातील मूळ गुन्हा रद्द झाल्यानंतरही ईडीने संबंधितांना समन्स बजावून तपास सुरूच ठेवला. मूळ प्रकरण तांत्रिक कारणांमुळे बंद झाले असले, तरी मनी लाँडरिंगच्या आरोपांचा तपास करता येतो, असा ईडीचा युक्तिवाद होता. दुसरीकडे, मूळ गुन्ह्याचाच आधार संपल्यानंतर ईडीला स्वतंत्रपणे तपास पुढे रेटता येणार नाही, अशी भूमिका याचिकाकर्त्यांनी मांडली.

न्यायालयाने ईडीची कारवाई रद्द करत तपास यंत्रणांच्या अधिकारांवर महत्त्वपूर्ण मर्यादा अधोरेखित केल्या. कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी राज्य सरकारची आहे, केंद्र सरकारची नाही, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

खरा सवाल इथेच आहे! तपास यंत्रणांना अधिकार दिले आहेत ते कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी, स्वतःच कायदा बनण्यासाठी नाहीत. छापे टाकता येतात म्हणून प्रत्येक संशय गुन्हा ठरत नाही आणि समन्स बजावता येतात म्हणून प्रत्येक नागरिकाला चौकशीच्या फेऱ्यांत अडकवता येत नाही. तपास यंत्रणांनीही कायद्याचे पालन केलेच पाहिजे.


राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या गदारोळात न्यायालयाचा हा हस्तक्षेप महत्त्वाचा आहे. कारण लोकशाहीत सरकार असो, विरोधक असोत किंवा तपास यंत्रणा, कोणतीही संस्था कायद्यापेक्षा मोठी नसते. ईडीला तपासाचे अधिकार आहेत; पण ते अमर्याद नाहीत. 'सुपर कॉप' बनण्याच्या नादात कायद्याची चौकट ओलांडली, तर न्यायालयाचा दरवाजा उघडाच आहे, याची ही ठोस आठवण आहे!

आणीबाणी ही इंदिरा गांधींची ऐतिहासिक चूक!

संजय गांधींच्या दबावामुळे लोकशाहीचा गळा घोटला? सोनिया गांधींचा धक्कादायक खुलासा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली : प्रतिनिधी

लोकशाहीच्या रक्षणाची भाषा करणाऱ्या काँग्रेसच्या इतिहासातील सर्वांत काळा अध्याय असलेल्या आणीबाणीबाबत आता गांधी कुटुंबातूनच महत्त्वपूर्ण कबुली समोर आली आहे. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी १९७७ मध्ये आणीबाणी लागू करण्याचा घेतलेला निर्णय ही मोठी चूक होती, असे काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या सोनिया गांधी यांनी म्हटल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या निर्णयामागे संजय गांधींचा दबाव आणि त्यांचा वाढता हस्तक्षेप कारणीभूत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केल्याचे वृत्त आहे.



आत्मचरित्राच्या प्रकाशनापूर्वी दिलेल्या मुलाखतीत सोनिया गांधी यांनी त्या काळातील गांधी कुटुंबातील मतभेदांवर भाष्य केले. त्यांच्या म्हणण्यानुसार, इंदिरा गांधी या मूलतः लोकशाहीवादी विचारांच्या होत्या. मात्र, आणीबाणी लागू करण्याच्या निर्णयावेळी त्या मानसिक दबावाखाली होत्या.

कौटुंबिक चर्चेदरम्यान संजय गांधी यांनी विरोधकांना रोखण्याची गरज असल्याचे सांगत आणीबाणीच्या निर्णयासाठी दबाव आणला. दुसरीकडे, राजीव गांधी यांनी आणीबाणीऐवजी निवडणुकांची वाट पाहण्याचा सल्ला दिला होता. मात्र, संजय गांधींच्या प्रभावापुढे तो सल्ला मान्य झाला नाही, असा खुलासा करण्यात आला आहे.

संजय गांधींकडे कोणतेही घटनात्मक किंवा मंत्रिमंडळातील पद नसतानाही त्यांचा सत्तेवर मोठा प्रभाव होता. जबरदस्तीची नसबंदी, दिल्लीतील झोपडपट्ट्यांवरील कारवाई आणि नागरिकांच्या स्वातंत्र्यावर घातलेली बंधने यामुळे सामान्य जनतेला मोठी किंमत मोजावी लागली. आणीबाणीच्या काळात विरोधकांना तुरुंगात डांबण्यात आले, माध्यमांवर सेन्सॉरशिप लादण्यात आली आणि नागरिकांचे मूलभूत अधिकार मर्यादित करण्यात आले.

या कबुलीमुळे काँग्रेसच्या इतिहासातील जबाबदारीचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. लोकशाहीची चूक मान्य करणे महत्त्वाचे; पण त्या चुकीची राजकीय आणि नैतिक जबाबदारी स्वीकारणेही तितकेच आवश्यक आहे.

नक्षलवाद संपला, आता सरकारविरोधकांनाही 'वैचारिक नक्षलवादी' ठरवणार? मोदींच्या बस्तरमधील विधानाने नवा वाद!

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
बस्तर / वृत्तसंस्था

देशातून सशस्त्र नक्षलवाद संपविण्याचा दावा करतानाच आता वैचारिक नक्षलवाद्यांविरोधात लढण्याची भाषा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली आहे. छत्तीसगडमधील बस्तर येथे सीआरपीएफ जवानांसोबत दिवाळी साजरी करताना मोदी यांनी काही संघटनांवर वैचारिक नक्षलवाद्यांचा प्रभाव असल्याचा आरोप केला. मात्र, या विधानातून सरकारविरोधात आवाज उठवणाऱ्या संघटना आणि विचारवंतांनाही संशयाच्या चौकटीत उभे करण्याचा प्रयत्न होतोय का, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

मोदी म्हणाले की, देशातील प्रत्येक जिल्हा नक्षलवादमुक्त झाला असून याचे श्रेय सुरक्षा दलाच्या त्यागाला आणि बलिदानाला जाते. गेल्या ४७ वर्षांत पहिल्यांदाच मागील एका वर्षात कर्तव्य बजावताना सीआरपीएफच्या एकाही जवानाला प्राण गमवावे लागले नसल्याचा दावाही त्यांनी केला.

एकेकाळी देशातील जवळपास २० राज्यांमधील २३० हून अधिक जिल्हे नक्षलवादाच्या प्रभावाखाली होते. नागरिकांना मतदानाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात होते. हजारो गावांमध्ये भीतीचे वातावरण होते, असे मोदी यांनी सांगितले.



सरकारने नक्षलवाद्यांच्या आर्थिक रसद पुरवठ्यावर प्रहार केल्यामुळे त्यांचे जाळे उद्ध्वस्त झाल्याचा दावाही त्यांनी केला. मात्र, आता त्यांच्या भाषणाचा रोख केवळ सशस्त्र नक्षलवादापुरता मर्यादित राहिलेला नाही. संविधान आणि लोकशाहीविरोधात लोकांना भडकवणाऱ्या वैचारिक नक्षलवाद्यांचा मुकाबला करण्याचे आवाहन त्यांनी केले.

इथेच खरा प्रश्न निर्माण होतो. हिंसक कारवायांना विरोध करणे आणि सरकारच्या धोरणांवर टीका करणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत. सरकारविरोधातील प्रत्येक आवाजाला वैचारिक नक्षलवादाचे लेबल लावले जाणार असेल, तर लोकशाहीतील मतभेदांचे स्थान कुठे उरणार? नक्षलवादाविरोधातील लढाईला यश मिळणे महत्त्वाचेच; पण त्या नावाखाली विचार स्वातंत्र्य संकुचित होता कामा नये.

८२५ कोटींचा शिवाजीनगर बसस्थानक प्रकल्प! पुणेकरांना आधुनिक वाहतूक केंद्राचे स्वप्न; पण तीन-चार वर्षे प्रतीक्षेची परीक्षा

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
पुणे : प्रतिनिधी

पुण्याच्या सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा चेहरामोहरा बदलण्याचा दावा करत शिवाजीनगर एसटी बसस्थानकाच्या पुनर्विकासासाठी तब्बल ८२५ कोटी रुपयांचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ आणि महामेट्रो यांच्यात सार्वजनिक-खासगी भागीदारी तत्त्वावर याबाबत सामंजस्य करार झाला आहे. मात्र, पुणेकरांसाठी महत्त्वाकांक्षी ठरणाऱ्या या प्रकल्पाची खरी परीक्षा आता प्रत्यक्ष अंमलबजावणीत होणार आहे.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत या करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शिवाजीनगर बसस्थानक महाराष्ट्रातील सर्वांत मोठे आणि आधुनिक वाहतूक केंद्र ठरण्याचा दावा करण्यात येत आहे. या केंद्रात प्रशस्त प्रतीक्षागृह, मोठी बस पार्किंग व्यवस्था, स्वतंत्र दुरुस्ती कार्यशाळा आणि व्यावसायिक वापरासाठी जागा उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, एसटी बस, पुणे मेट्रो, रेल्वे, पीएमपीएमएल आणि रिक्षा या सर्व वाहतूक सेवा एकाच ठिकाणी जोडण्याचे नियोजन आहे. दररोज एक लाखांहून अधिक प्रवाशांची ये-जा होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. पुणे, मुंबई, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भातील प्रवाशांना याचा फायदा होण्याची अपेक्षा आहे. मात्र, पुण्यात मेट्रो, रस्ते, उड्डाणपूल आणि वाहतूक प्रकल्पांच्या घोषणांचा इतिहास पाहता केवळ सामंजस्य करार म्हणजे विकास नव्हे. निविदा प्रक्रिया कधी पूर्ण होणार, प्रत्यक्ष काम कधी सुरू होणार, खर्च वाढणार का आणि प्रवाशांना बांधकाम काळात पर्यायी व्यवस्था काय असेल, हे प्रश्न अनुत्तरित आहेत. ८२५ कोटींचा प्रकल्प कागदावर भव्य दिसतो; पण पुणेकरांना प्रत्यक्ष सुविधा वेळेत मिळाल्या तरच या विकासाच्या दाव्याला अर्थ राहील.

झाडे वाचविण्यासाठी बोअरवेलला सवलत; पण भूजल संपले तर जबाबदारी कोणाची? फडणवीस सरकारचा १५ डिसेंबरपर्यंत निर्णय

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
नवी दिल्ली / वृत्तसंस्था

नागपूर : राज्यात दुष्काळाचे संकट गडद होत असताना शेतातील झाडे आणि फळबागा वाचविण्यासाठी राज्य सरकारने विंधन विहिरी खोदण्यावरील बंदीत १५ डिसेंबरपर्यंत मर्यादित सवलत जाहीर केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही घोषणा केली असली, तरी या निर्णयामुळे शेतकऱ्यांना किती दिलासा मिळणार आणि आधीच खालावलेल्या भूजल पातळीवर किती ताण येणार, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

परिस्थितीत झाडे जगविण्यासाठी पाण्याची नितांत आवश्यकता असलेल्या ठिकाणीच नवीन बोअरवेल खोदण्यास परवानगी दिली जाणार आहे. मात्र, ही सवलत सरसकट नसून संबंधित यंत्रणेची पूर्वपरवानगी बंधनकारक असेल. बोअरवेल खोलीकरणालाही बंदी कायम असल्याचे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

राज्यातील भूजलसाठ्यांवर आधीच मोठा ताण आहे. अशा परिस्थितीत नवीन विंधन विहिरींना परवानगी देताना नेमके निकष काय असतील, पाण्याची उपलब्धता कशी तपासली जाणार आणि परवानगी देण्याची प्रक्रिया किती पारदर्शक असेल, हे स्पष्ट होणे गरजेचे आहे. अन्यथा सवलतीचा लाभ काही शेतकऱ्यांपुरताच मर्यादित राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

दरम्यान, वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी जंगलालगतच्या शेतांमध्ये तार कुंपण योजनेला प्राधान्य देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तलाव आणि जलसाठ्यांमधील गाळ काढून तो शेतजमिनीत टाकण्याच्या कामांनाही प्रोत्साहन दिले जाणार आहे.

मात्र, दुष्काळावर कायमस्वरूपी उपाय केवळ बोअरवेलच्या परवानगीत नाही. जलसंधारण, भूजल पुनर्भरण, पाण्याचे समन्यायी वाटप आणि सिंचन व्यवस्थेचे नियोजन यावर ठोस काम आवश्यक आहे. झाडे जगविण्यासाठी दिलेली सवलत स्वागतार्ह असली, तरी भूजल व्यवस्थापनाचा दीर्घकालीन आराखडा सरकारने मांडणे तितकेच महत्त्वाचे आहे.

५० वयानंतर आयव्हीएफ उपचारांना हायकोर्टाचा नकार! मातृत्वाच्या आशेवर वयोमर्यादेचे बंधन

■ **दैनिक राज्य लोकतंत्र**
चंदीगड : विशेष वृत्त

मातृत्वाची इच्छा, वैद्यकीय तंत्रज्ञानाची प्रगती आणि कायद्याने घालून दिलेली वयोमर्यादा यांच्यातील संघर्ष अधोरेखित करणारा महत्त्वपूर्ण निकाल पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने दिला आहे. महिलेने वयाची ५० वर्षे ओलांडल्यानंतर तिच्यावर आयव्हीएफ (आयव्हीएफ) उपचारांद्वारे भ्रूण हस्तांतरण करता येणार नाही, असा स्पष्ट निर्वाळा न्यायालयाने दिला. विशेष म्हणजे, संबंधित महिलेने वयाची मर्यादा ओलांडण्यापूर्वीच कायदेशीररीत्या भ्रूण तयार करून ते गोठवलेले असले, तरी त्याचा आधार घेऊन पुढील उपचारांचा अधिकार मिळू शकत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायमूर्ती त्रिभुवन दहिया यांनी हा निर्णय देताना सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञान (नियमन) कायदा, २०२१ मधील कलम २१(जी) चा आधार घेतला. या तरतुदीनुसार, महिलांसाठी सहाय्यक प्रजनन तंत्रज्ञानाच्या सेवांचा लाभ घेण्याची कमाल वयोमर्यादा ५० वर्षे निश्चित करण्यात आली आहे.

या प्रकरणात संबंधित दाम्पत्याने महिलेचे वय ५० वर्षांपेक्षा कमी असताना भ्रूण तयार करून ते क्रायोप्रिझर्व्हेशन म्हणजेच अतिशीत अवस्थेत सुरक्षित ठेवले होते. मात्र, पुढील उपचार आणि भ्रूण हस्तांतरणाची वेळ येईपर्यंत महिलेने वयाची निर्धारित मर्यादा ओलांडली. त्यामुळे भ्रूण आधीच तयार असल्याने उपचार पूर्ण करण्याचा आपल्याला अधिकार आहे, असा युक्तिवाद करण्यात आला.

मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद मान्य केला नाही. भ्रूण गोठवून ठेवण्यामुळे भविष्यात कोणत्याही परिस्थितीत उपचार पूर्ण करण्याचा कायमस्वरूपी किंवा निहित अधिकार निर्माण होत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

या प्रकरणात न्यायालयासमोर एकूण सहा याचिका होत्या. मुख्य याचिका वीणा देवी आणि त्यांचे पती यांनी दाखल केली होती. हे दाम्पत्य प्राथमिक शाळेतील शिक्षिका आणि शेतकरी असून, त्यांना आयव्हीएफ उपचारांद्वारे अपत्य हवे होते.

२२ नोव्हेंबर २०२३ रोजी दोघांचे वय ४७ वर्षे असताना नऊ भ्रूण कायदेशीररीत्या तयार करून गोठवण्यात आले होते. जुलै २०२४ मधील पहिला भ्रूण हस्तांतरणाचा प्रयत्न अयशस्वी ठरला. फेब्रुवारी २०२५ मध्ये दुसऱ्या प्रयत्नातून गर्भधारणा झाली; मात्र पाच ते सहा आठवड्यांनंतर ती गर्भधारणा संपुष्टात आली. दरम्यान, १० डिसेंबर २०२५ रोजी महिलेने वयाची ५० वर्षे पूर्ण केली. त्यानंतरही चार भ्रूण सुरक्षित ठेवलेले होते. ते हस्तांतरित करण्याची परवानगी द्यावी, अशी दाम्पत्याची मागणी होती.

न्यायालयाने मात्र प्रत्येक टप्प्यावर वयोमर्यादा पूर्ण असणे आवश्यक असल्याचे सांगितले. भ्रूण तयार करणे आणि त्याचे महिलेच्या गर्भाशयात हस्तांतरण करणे या दोन स्वतंत्र प्रक्रिया आहेत. त्यामुळे पहिली प्रक्रिया कायदेशीररीत्या झाली म्हणून दुसऱ्या प्रक्रियेसाठीही कायमस्वरूपी अधिकार मिळत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

दाम्पत्याची एकत्रित वयोमर्यादा ग्राह्य नाही!

या निकालातील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पती-पत्नीला एकत्रित घटक मानून वयोमर्यादा ठरवता येणार नाही. कायद्यानुसार महिलांसाठी २१ ते ५० वर्षे, तर पुरुषांसाठी २१ ते ५५ वर्षे अशी स्वतंत्र वयोमर्यादा आहे. यापैकी कोणत्याही व्यक्तीने कमाल वयोमर्यादा ओलांडल्यास त्या व्यक्तीला संबंधित एआरटी उपचार घेता येणार नाहीत.

मात्र, न्यायालयाने महिलांच्या स्वतंत्र अधिकाराबाबतही महत्त्वाचे स्पष्टीकरण दिले. पतीने ५५ वर्षांची मर्यादा ओलांडली असली, तरी पत्नीचे वय ५० वर्षांपेक्षा कमी असल्यास ती स्वतंत्रपणे एआरटी उपचार घेऊ शकते.

या निर्णयासाठी न्यायालयाने २१ जानेवारी २०२६ रोजी केंद्रीय आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालयाच्या संशोधन विभागाने नियुक्त केलेल्या तज्ज्ञ समितीच्या अहवालाचाही आधार घेतला. पन्नाशीनंतरची गर्भधारणा अधिक जोखमीची असू शकते तसेच माता आणि बालकाच्या आरोग्याशी संबंधित गुंतागुंत वाढू शकते, असे अहवालात नमूद होते.

या निकालामुळे आयव्हीएफ उपचार घेणाऱ्या ज्येष्ठ दाम्पत्यांसमोर कायदेशीर मर्यादांचा प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. एका बाजूला वैद्यकीय तंत्रज्ञानामुळे गोठवलेले भ्रूण भविष्यात वापरण्याची शक्यता निर्माण झाली आहे; तर दुसरीकडे कायदा प्रत्येक उपचाराच्या टप्प्यावर वयोमर्यादा बंधनकारक ठरवतो. त्यामुळे प्रजननाचा अधिकार, वैद्यकीय स्वायत्तता आणि बालकाचे हित यांच्यातील समतोलाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

संपादकीय

दलालीवर चालणारे परराष्ट्र धोरण!

जागतिक राजकारणाच्या पटावर भारत आपल्या 'असीम आणि स्वयंभू' मुत्सद्देगिरीचा डंका पिटत असताना, वॉशिंग्टनच्या प्रशासकीय गल्लीबोळातून एक असा दस्तऐवज बाहेर आला आहे, ज्याने या आभासी जागतिक प्रभावाचे वस्त्रहरण केले आहे. अमेरिकेच्या 'फॉरेन एजंट्स रजिस्ट्रेशन ॲक्ट' (ऋअठअ) च्या डिस्क्लोजर फायलिंगने आपल्या परराष्ट्र व्यवहारातील एक अत्यंत लाजीरवाणे चित्र जगासमोर आणले आहे. वॉशिंग्टनस्थित भारतीय दूतावासाने अमेरिकन लॉबिंग फर्म 'डक्रथ झरऑपशऑ डडउ' ला भारत-अमेरिका संबंध सुधारण्यासाठी नियुक्त केले होते. या फर्मचे मालक कोण? तर ट्रम्प यांच्या विश्वासातले जॅसन मिलर! आणि या कराराची अधिकृत किंमत काय होती? *दरमहा १,५०,००० डॉलर्स!* म्हणजेच भारतीय करदात्यांच्या खिशातून दरमहा तब्बल *१ कोटी २५ लाख रुपयांपेक्षा जास्त रक्कमेची उधळपट्टी!*

आता जरा या पैशाच्या मोबदल्यात मिळालेल्या कामाचे गणित मांडूया. हा करार एप्रिल २०२५ मध्ये सुरू झाला आणि एप्रिल २०२६ मध्ये त्याचे अत्यंत उत्साहाने नूतनीकरणही करण्यात आले. अखेर २३ जून २०२६ रोजी जॅसन मिलर हे स्वतः अमेरिकन सरकारमध्ये 'स्पेशल गव्हर्नमेंट एम्प्लॉई' बनले आणि हा कंत्राटी खेळ थांबला. पण या संपूर्ण कार्यकाळात, विशेषतः मे आणि जून २०२६ या दोन महिन्यांत, या सव्वा कोटी रुपये महिना लाटणाऱ्या फर्मने भारतासाठी नक्की कोणता डोंगर उपसला?

ऋअठअ च्या कागदपत्रांनुसार, या फर्मने व्हाइट हाऊसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी भारताच्या बाजूने केवळ *८ फोन कॉल्स* आयोजित केले! होय, अगदी अचूक वाचलेत फक्त आठ फोन कॉल्स! यात अमेरिकेचे ट्रेझरी सेक्रेटरी स्कॉट बेझंट आणि युनायटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेझेंटेटिव्ह (णडढठ) जेमिसन ग्रीर यांच्याशी झालेल्या संवादाचा समावेश होता. जर तुम्ही एका फोन कॉलची किंमत काढायला बसलात, तर लक्षात येईल की अमेरिकन अधिकाऱ्याचा 'हॅलो' ऐकण्यासाठी भारतीय करदात्यांनी कोट्यवधी रुपये मोजले आहेत. याला 'स्ट्रॅटेजिक मुत्सद्देगिरी' म्हणायचे की जनतेच्या पैशांवर घातलेला अधिकृत दरोडा?

नाटकाचा अंक इथेच संपत नाही. लॉबिंगच्या या बाजारात 'चशॲर्लीॲ झ्रीलश्रळल अषषरळऑ' नावाची दुसरी फर्मही तैनात होती, ज्यांना वेगळे *७५,००० डॉलर्स प्रति महिना* (सुमारे ६२ लाख रुपये) मोजले जात होते. या फर्मच्या ऋअठअ फायलिंगमधील सत्य तर अधिकच हास्यास्पद आहे. ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पंतप्रधान नरेंद्र मोदींचे अभिनंदन करणारी जी पोस्ट टाकली होती, ती पोस्ट 'प्रसारित' (ळींशाळपरींश) करण्याचे काम या फर्मने आपल्या खात्यावर दाखवले आहे! आपले परराष्ट्र मंत्रालय आता अत्यंत केविलवाणा बचाव करत स्पष्टीकरण देत आहे की, ''फर्मने केवळ ती पोस्ट री-पोस्ट केली, विकत घेतली नाही.'' पण मूळ प्रश्न हा आहे की, अमेरिकन राष्ट्राध्यक्षांच्या एका सोशल मीडिया पोस्टची री-पोस्ट फिरवण्यासाठी आणि पीआर सांभाळण्यासाठी ६२ लाख रुपये महिना मोजण्याची नौबत का आली? आपल्या दूतावासातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे इंटरनेट कनेक्शन कापले होते की काय?

भारताचे परराष्ट्र धोरण हे जगातील सर्वात चतुर आणि अनुभवी मुत्सद्यांऽरे चालवले जाते, असा ढोल रात्रंदिवस वाजवला जातो. मग असे असताना वॉशिंग्टनच्या वर्तुळात थेट प्रवेश मिळवण्यासाठी आणि अवघे आठ फोन कॉल्स जोडण्यासाठी परदेशी एजन्सींना कोट्यवधी रुपयांची कंत्राटे का बाटावी लागतात? या ८ फोन कॉल्समधून भारताला नेमकी काय ठोस फलनिष्पत्ती मिळाली, याचा एक शब्दही ऋअठअ अहवालात नाही. म्हणजेच, देशाच्या पदरात काही पडो अथवा न पडो, दलालांचे कमिशन मात्र वेळेवर पोहोचले पाहिजे! २३ जून रोजी मिलर सरकारमध्ये सामील झाले आणि हा कंत्राटी अध्याय बंद झाला. जोपर्यंत तुम्ही बाहेर आहात तोपर्यंत लॉबिंगच्या नावाखाली पैसे कमवा आणि आत गेल्यावर दुकान बंद करा हा कसला नैतिक व्यवहार? आपल्या देशात सामान्य नागरिक महागाई आणि कराच्या ओझ्याखाली भरडला जात असताना, वॉशिंग्टनच्या वातानुकूलित खोल्यांमध्ये काही फोन कॉल्ससाठी कोट्यवधी रुपयांची खैरात वाटली जात आहे. जर जागतिक संबंध केवळ अशा महागड्या दलालीवर आणि पीआर स्टंटवरच टिकून असतील, तर आपल्या परराष्ट्र धोरणाच्या 'विश्वगुरू' छापाच्या गप्पा मारणे आता तरी थांबवले पाहिजे. हा केवळ मुत्सद्देगिरीचा पराभव नाही, तर देशातील करदात्यांच्या विश्वासाचा झालेला थेट घात आहे.

पिंपरी-चिंचवडमध्ये दिवाळी पहाट कार्यक्रमात स्थानिक कलाकारांचा कलाविष्कार

आमदार अण्णासाहेब बनसोडे व नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे यांच्या सौजन्याने आयोजन; भाग्यश्री (टिना) शर्मा घेवारे यांचा पुढाकार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य विधानसभेचे उपाध्यक्ष तथा पिंपरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार अण्णासाहेब दादू बनसोडे आणि प्रभाग क्रमांक ९ चे नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे यांच्या सौजन्याने अखिल पिंपरी-चिंचवड कलामंचच्या वतीने सांगवी येथील डॉल्फिन्स हॉलमध्ये दिवाळी पहाट, सांस्कृतिक कार्यक्रम आणि फराळ वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा भाग्यश्री (टिना) शर्मा घेवारे यांच्या पुढाकारातून झालेल्या या कार्यक्रमात शहरातील स्थानिक कलाकारांनी विविध कलांचे सादरीकरण करून रसिकांची दाद मिळवली.

महाराष्ट्राची लोकधारा, अभंग, भक्तिगीते, भावगीते, हिंदी व मराठी गाणी, लावणी, लोकगीते आणि काव्यरचना अशा विविध कलाप्रकारांतून महाराष्ट्राच्या समृद्ध कला-संस्कृतीचे दर्शन घडले. स्थानिक कलाकारांना एकाच व्यासपीठावर सादरीकरणाची संधी मिळाल्याने कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.

या कार्यक्रमाला पत्रकार मुज्जफर इनामदार, आंतरराष्ट्रीय गायक चंद्रकांत पवार, राष्ट्रवादीचे नेते राजेंद्र जगताप, चित्रपट निर्माते सूर्यकांत पवार आणि कीर्तनकार पुरुषोत्तम हिंगणकर महाराज यांची प्रमुख उपस्थिती होती.



यावेळी भाग्यश्री (टिना) शर्मा घेवारे म्हणाल्या की, आमदार अण्णासाहेब बनसोडे हे पिंपरी-चिंचवडमधील कलाकारांच्या पाठीशी नेहमीच खंबीरपणे उभे राहतात. कलाकारांना प्रोत्साहन देणे, संधी उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या कलाविश्वाला बळ देण्यासाठी त्यांचे सातत्याने सहकार्य मिळते. ते अखिल पिंपरी-चिंचवड कलामंचचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत. या कार्यक्रमासाठी अल्पावधीत हॉल उपलब्ध करून दिल्याबद्दल डॉल्फिन्स गार्डन स्टुडिओ, सांगवीचे सर्वेसर्वा राज सोमवंशी आणि त्यांच्या टीमचेही त्यांनी आभार मानले.

शहरातील अनेक कलाकारांकडे गुणवत्ता आणि कला असूनही त्यांना योग्य व्यासपीठ मिळण्याची गरज आहे. स्थानिक कलाकारांना प्राधान्य देऊन त्यांच्या कलागुणांना सन्मान आणि ओळख मिळवून देणे, हा कलामंचचा मुख्य उद्देश आहे. यापुढेही संस्थेच्या माध्यमातून अशा उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल, असे घेवारे यांनी सांगितले.

कलाकारांच्या सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत

गायन क्षेत्रात विद्या गायकवाड नढे, गायत्री साळवे, अशोक टाकळे, मनीषा इंगोले, जगन्नाथ खाडे, शेखर चांदणे, अमित देशमाने, प्रतीक सत्वाधीर, रेखा दुसाने, कोमल भोसले, सागर डाडर, संतोष माहेश्वरी, प्रमोद कुलकर्णी, सविता कोरडे, कविता तळेकर, मनीषा सपकाळे आणि सुरेखा कुलाल यांनी सुमधुर गीते सादर केली.

वाद्यवृंदात सेन कुमार, श्रीराम इंगळे, अशोक जाधव, विलास अडागळे, सोमनाथ कांबळे, राजकुमार काजोरिया, लखन अडागळे, गोकुळ आणि रोहन कळदकर यांनी साथसंगत केली. वृषाली सातपुते, भारती मोरे, सुजाता कुंभार आणि फिरोज मुजावर यांनी बहारदार लावणी सादर केली.

महाराष्ट्राची लोकधारा या विशेष सादरीकरणात रवी कांबळे, सँडी पाटील, सिद्धांत घागरमले, कावेरी गंगाळे, आकाश गायकवाड, रवींद्र शिंदे, लीनेश घाडगे, अमोल अडागळे आणि भाऊसाहेब सांगळे यांच्या समूहाने लोककलेचा आविष्कार सादर केला.

ध्वनी व्यवस्था सुनील पाटील (टेक्नॉलॉजी साऊंड) यांनी सांभाळली, तर लीनेश घाडगे आणि विक्रांत शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रकाश नवगिरे, मनीषा बाराथे, मेबल अल्हाट, मंगला पवार आणि मोनिका शिंदे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, सदस्य आणि कार्यकर्त्यांनी कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सहकार्य केले. उपस्थित मान्यवर, कलाकार आणि रसिकांचे संस्थेच्या वतीने आभार मानण्यात आले.

भीषण अपघात! इजिप्तमध्ये २ प्रवासी ट्रेन एकमेकांना धडकल्या; ४ जणांचा मृत्यू, ८८ हून अधिक जखमी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
काहिरा: । प्रतिनिधी

इजिप्तची राजधानी काहिराच्या दक्षिणेकडे रविवारी २ प्रवासी रेल्वेत जोरदार धडक झाली. या भीषण अपघातात आतापर्यंत ४ लोकांचा मृत्यू झाला असून ८८ हून अधिक जखमी आहेत. हा अपघात गीझाच्या अल अय्यात जिल्ह्यात झाला. जो काहिरापासून ७२ किमी अंतरावर आहे.

माहितीनुसार, फय्यूम प्रांताच्या दिशेने जाणाऱ्या एका रेल्वेने असवान प्रांतकडे जाणाऱ्या दुसऱ्या रेल्वेला पाठीमागून धडक दिली. या धडकेमुळे एक ट्रेन रुळावरून घसरली. या अपघातात ४ लोकांच्या मृत्यूची पुष्टी करण्यात आली आहे. ८८ हून अधिक



जखमी झाल्याचे वृत्त आहे. सर्व जखमींना उपचारासाठी नजीकच्या रुग्णालयात दाखल करण्यात आल्याची माहिती इजिप्तच्या परिवहन मंत्रालयाने दिली.

राष्ट्रपतींनी दिले चौकशीचे आदेश

इजिप्तचे राष्ट्रपती अब्देल फतह अल यांनी या दुर्घटनेबाबत दु:ख व्यक्त करत या अपघाताची तात्काळ चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. या दुर्घटनेतील जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांना कठोर शिक्षा दिला जाईल असं राष्ट्रपतींनी सांगितले. या अपघातानंतर तातडीने घटनास्थळी बचाव पथक आणि यंत्रणा पाठवण्यात आली. रेल्वे अधिकाऱ्यांनी ढिगारा हटवून रेल्वे सेवा लवकरात लवकर पूर्ववत करण्यासाठी क्रेन आणि इतर संसाधने तैनात केली आहेत.

याआधीही घडली होती दुर्घटना

विशेष म्हणजे मागील सप्टेंबर महिन्यातही दोन मालगाड्यांची धडक झाली होती. या दुर्घटनेत एक ट्रेन चालक आणि सहाय्यक जखमी झाला होता. अलीकडेच केनियातील माकुएनी येथे एक भीषण रस्ते अपघात घडला, ज्यात बस आणि ट्रकची समोरासमोर धडक होऊन किमान २२ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले.

जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले. पोलिसांच्या माहितीनुसार अपघात झाला तेव्हा बसमधील प्रवासी एका अंत्यविधीवरून परत येत होते. याच महामार्गावर सुमारे तीन आठवड्यांपूर्वी झालेल्या दुसऱ्या एका अपघातात १७ जणांचा मृत्यू झाला होता, त्यानंतर हा अपघात घडला होता.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी दाम्पत्याची स्नेहवनमधील मुलांसोबत दिवाळी; शिक्षणासाठी टॅबची भेट

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांशी साधला संवाद; शिक्षण, जिद्द आणि आत्मविश्वासाचा दिला संदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

दिवाळीचा आनंद समाजातील वंचित आणि गरजू मुलांसोबत वाटून घेण्याच्या उपक्रमातून पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि त्यांच्या पत्नी डॉ. आरती सूर्यवंशी यांनी आळंदी जवळील कोयाळी फाटा येथील स्नेहवन संस्थेतील मुलांसोबत दिवाळी साजरी केली. यावेळी मुलांना दिवाळीचा फराळ वाटप करण्यासह त्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी टॅब भेट देण्यात आले.

आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांचे शिक्षण आणि संगोपन करणारी स्नेहवन संस्था अशोक देशमाने आणि अर्चना देशमाने चालवतात. आयुक्त दाम्पत्याने संस्थेतील विविध उपक्रमांची पाहणी करून मुलांशी मनमोकळा संवाद साधला. मुलांच्या डोळ्यांतील स्वप्ने, शिकण्याची जिद्द आणि आत्मविश्वास पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मुलांना शिक्षणाच्या अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने टॅब भेट देण्यात आले. या वेळी मुलांनी आयुक्तांना त्यांच्या प्रशासकीय प्रवासाबद्दल, शैक्षणिक संघर्षाबद्दल, महापालिकेच्या कामकाजाबद्दल आणि नागरिकांच्या समस्या सोडविण्याच्या प्रक्रियेबद्दल अनेक प्रश्न विचारले.

'शिक्षण थांबवू नका, आत्मविश्वास कायम ठेवा!'

मुलांशी संवाद साधताना डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आपल्या बालपणापासून प्रशासकीय अधिकारी होण्यापर्यंतचा प्रवास उलगडला. आर्मी ऑफिसर म्हणून झालेली निवड, त्यानंतर कस्टम अधिकारी, सहकार विभागातील काम, कोल्हापूर व रायगड येथील प्रशासकीय जबाबदाऱ्या, जिल्हाधिकारी आणि महानगरपालिका आयुक्तपदापर्यंतचा प्रवास त्यांनी सांगितला.

शिक्षण घेताना अनेक अडचणी येतात; मात्र त्यातून मार्ग काढण्यासाठी आत्मविश्वास आणि जिद्द महत्त्वाची असते. कोणत्याही परिस्थितीत शिक्षण घेणे थांबवू नका. नियमित अभ्यास करा, वाचनाची सवय लावा आणि दररोज काहीतरी नवीन शिका, असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.



सरकारी सेवेतील अनुभव सांगताना त्यांनी नागरिकांच्या सेवेला महत्त्व दिले. आपल्याकडे काम घेऊन येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या चेहऱ्यावर समाधानाचे हास्य उमटले पाहिजे. गरजू नागरिकांची मदत करणे आणि त्यांची कामे मार्गी लावणे, हा प्रत्येक सरकारी अधिकाऱ्याचा दृष्टिकोन असावा, असेही त्यांनी सांगितले.

मुलांनी त्यांच्या वाचनाची आवड, आवडती पुस्तके आणि टेस्लासारख्या आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील घडामोडींबाबतही प्रश्न विचारले. मुलांच्या जिज्ञासू वृत्तीचे त्यांनी कौतुक केले.

'स्वप्नांना आकाश देण्याची ताकद प्रत्येकात असते!'

डॉ. आरती सूर्यवंशी यांनी मुलांच्या जिद्दीचे आणि आत्मविश्वासाचे कौतुक केले. आयुष्यातील आई-वडिलांचे छत्र हरवले असले, तरी प्रत्येकाच्या मनात संघर्ष करण्याची ताकद असते. स्वत:मधील ही शक्ती ओळखून पुढे जाण्याची गरज आहे. प्रत्येक समस्येवर उत्तर असते; फक्त ते शोधण्याची जिद्द असली पाहिजे, असे त्या म्हणाल्या. स्नेहवनसारख्या संस्था शेतकऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणासाठी आणि संगोपनासाठी काम करीत आहेत, ही समाधानाची बाब आहे. योग्य शिक्षण, चांगले संस्कार आणि प्रेमळ वातावरण मिळाल्यास ही मुले भविष्यात सक्षम आणि जबाबदार नागरिक बनतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मुलांनी आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबांची परिस्थिती आणि स्वत:च्या भवितव्याबाबतही संवाद साधला. यावेळी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी शेतकऱ्यांना आवाहन करताना सांगितले की, दुष्काळ किंवा आर्थिक संकट कितीही गंभीर असले, तरी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नये. कुटुंबाचा आणि मुलांच्या भवितव्याचा विचार करावा. कठीण काळ कायम राहत नाही. धैर्याने आणि संयमाने परिस्थितीचा सामना करावा.

१५ प्रकारच्या प्रयोगशाळांतून मुलांना कौशल्य प्रशिक्षण

स्नेहवनमध्ये महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील मुलांचे संगोपन केले जाते. येथे केवळ पुस्तकी शिक्षण न देता मुलांना स्वावलंबी बनविण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातात. संस्थेत गोशाळा, बायोगॅस प्रकल्प, सौरऊर्जा प्रकल्प, ओपन जिम, कौशल्य विकास केंद्र, बेकरी व्यवसाय प्रशिक्षण आणि विविध कौशल्यांसाठी १५ प्रकारच्या प्रयोगशाळा उभारण्यात आल्या आहेत.

याशिवाय एमपीएससी-यूपीएससी प्रशिक्षण केंद्र, विज्ञान प्रयोगशाळा आणि कंटेनर ग्रंथालय अशा सुविधा उपलब्ध आहेत. मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी या उपक्रमांचा उपयोग होत आहे. ज्येष्ठ समाजसेवक प्रकाश बाबा आमटे यांच्या हस्ते संस्थेच्या परिसरात लावण्यात आलेले पेरूचे झाडही विशेष आकर्षण आहे. विशेष म्हणजे, संस्थेतील मुलांनीच आयुक्त दाम्पत्याला संपूर्ण शाळा, विविध प्रयोगशाळा आणि तेथील उपक्रमांची माहिती दिली. प्रयोग, प्रकल्प आणि त्यांच्या उपयोगाबाबत मुलांनी आत्मविश्वासाने केलेले सादरीकरण पाहून आयुक्त दाम्पत्याने समाधान व्यक्त केले. या मुलांमध्ये भविष्यातील आयएएस अधिकारी, माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ, पत्रकार आणि मानसशास्त्रज्ञ घडण्याची क्षमता आहे. त्यांच्या भविष्यातील प्रगतीकडे लक्ष ठेवण्याची उत्सुकता असल्याचे डॉ. सूर्यवंशी यांनी यावेळी सांगितले. आयुक्त दाम्पत्याच्या या दिवाळी भेटीमुळे स्नेहवनमधील मुलांना आनंदासोबतच शिक्षणासाठी नवी प्रेरणा मिळाली. फराळ आणि टॅबच्या भेटीपेक्षा मुलांच्या स्वप्नांना समजून घेणारा हा संवाद या भेटीचे विशेष वैशिष्ट्य ठरले.

दैनिक राज्य लोकतंत्र हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

सारांश वृत्त

काँग्रेस आमदाराच्या खोलीत आक्षेपार्ह अवस्थेत सापडले तरुण-तरुणी, नेमका प्रकार काय? विधानसभा सचिवांकडे तक्रार

पुणे : प्रतिनिधी

मध्य प्रदेशची राजधानी भोपाळमधील आमदार विश्रामगृहात घडलेल्या धक्कादायक प्रकारामुळे सुरक्षाव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. माझ्या गैरहजेरीत मला देण्यात आलेल्या खोलीमध्ये एक तरुण-तरुणी आक्षेपार्ह स्थितीत आढळले होते, मी अचानत तिथे आलो असता ते पळून गेले, असा आरोप राज्यातील महिदपूर विधानसभा मतदारसंघातील आमदार दिनेश जैन बोस यांनी केला आहे. त्यांनी याबाबत विधानसभा सचिवाकडे तक्रार केली असून, याबाबत चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

हा संपूर्ण प्रकार आमदार विश्रामगृह ब्लॉक -३ मध्ये घडला आहे. आमदार दिनेश जैन बोस यांनी सांगितले की, २ नोव्हेंबर रोजी मी दिल्लीहून परतल्यावर दुपारी२ वाजण्याच्या सुमारास विश्रामगृहात पोहोचलो. तिथे खोली क्रमांक १४-१५ माझ्यासाठी आरक्षित आहेत. मी तेथील केअर टेकरकडे खोलीची चावी मागितली. मात्र तिथे चावी नव्हती. त्यानंतर मला १४ नंबरच्या खोलीची चावी देण्यात आली.

मी जेव्हा १४ क्रमांकाच्या खोलीत पोहोचलो. तेव्हा १५ क्रमांच्या खोलीत एक तरुण आणि तरुण आणि तरुणी आक्षेपार्ह स्थितीत होते. मला पाहताच ते तिथून पळाले, असा आरोप दिनेश जैन बोस यांनी केला.

मुख्यमंत्र्यांनी बांधावर जाऊन केली पीक नुकसानीची पाहणी; शेतकऱ्यांना मदतीची ग्वाही

सोनेगाव रिठी आणि कोहळी येथे शेतकऱ्यांशी संवाद; कापूस, तूर पिकांच्या नुकसानीची घेतली माहिती

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नागपूर : प्रतिनिधी

पावसाअभावी कापूस आणि तूर पिके सुकू लागल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. या परिस्थितीत शेतकऱ्यांना तातडीने आवश्यक मदत देण्यात येईल. नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीचा सामना करणाऱ्या शेतकऱ्यांच्या व्यथा जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी लोहारी सावंगा येथे मुक्काम केला. रविवारी सकाळी त्यांनी सोनेगाव रिठी आणि कळमेश्वर तालुक्यातील कोहळी येथे शेतांच्या बांधावर जाऊन पीक नुकसानीची पाहणी केली तसेच शेतकऱ्यांशी संवाद साधला.

सोनेगाव रिठी येथे दिलीप सरोदे यांच्या शेतात जाऊन मुख्यमंत्र्यांनी कापूस पिकाची स्थिती जाणून घेतली. पावसाअभावी कापसाची अपेक्षित वाढ झालेली नाही. बोंडांची वाढ आणि फुटण्याची प्रक्रियाही प्रभावित झाल्याने उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता शेतकऱ्यांनी व्यक्त केली. या परिस्थितीत शेतकऱ्यांनी खचून जाऊ नये, शासन त्यांच्या पाठीशी असून आवश्यक मदत केली जाईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.



दरम्यान, दुष्काळामुळे पिकांचे नुकसान झाले असतानाच वन्यप्राण्यांकडूनही पिकांची नासधूस होत आहे. त्यामुळे शेतीच्या संरक्षणासाठी सौर कुंपण उपलब्ध करून देण्याची मागणी दिलीप सरोदे यांनी केली. यावर वन्यप्राण्यांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी सौर कुंपणाची योजना प्रभावीपणे राबविण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्र्यांनी दिले.

कोहळीतील शेतकऱ्यांना मदतीचे आश्वासन

कळमेश्वर तालुक्यातील कोहळी येथील बाबुराव काळे यांच्या शेतात मुख्यमंत्र्यांनी कापूस आणि तूर पिकांची पाहणी केली. दीर्घकाळ पाऊस न झाल्याने दोन्ही पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आतापर्यंत पाच हजार रुपयांची मदत देण्यात आली असून उर्वरित मदतही थेट खात्यात जमा केली जाईल. कोणताही शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.

दुष्काळी मदतीसाठी ॲग्रीस्टॅक नोंदणी आवश्यक असली, तरी सध्याच्या परिस्थितीत ऑनलाइन नोंदणीऐवजी ऑफलाइन नोंदणी करण्याची सवलत देण्यात आली आहे, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

दुष्काळी परिस्थितीत आवश्यकतेनुसार धान्य उपलब्ध करून दिले जात आहे. मात्र, ज्या शेतकऱ्यांकडे शिधापत्रिका नाही, अशांची प्राधान्याने नोंदणी करून त्यांनाही धान्य योजनेचा लाभ द्यावा, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला केली.

या पाहणी दौऱ्यावेळी आमदार चरणसिंग ठाकूर, राजीव पोतदार, शेतकरी वसंतराव चापले, संदीप सरोदे, दिनेश दापले, सरपंच बिपीन चापले, नलिनी सतीश रेवतकर, मनोहर कुंभारे तसेच जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी आणि अन्य अधिकारी उपस्थित होते.

लोणीतील विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा रौप्यमहोत्सवी वर्धापन दिन सोहळा मंगळवारी

इंदुरीकर महाराजांच्या कीर्तनासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

लोणी-धामणी : प्रतिनिधी

लोणी (ता. आंबेगाव) येथील पैसा-गलठा वस्तीतील श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिराचा २७ वा वर्धापन दिन सोहळा मंगळवार (दि. १०) रोजी दीपावली पाडव्याच्या शुभमुहूर्तावर उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. ह.भ.प. कोंढळीकर महाराज (पंढरपूर) आणि ह.भ.प. गुरुवर्य बबन महाराज सिनलकर यांच्या प्रेरणेने या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

सोहळ्याची सुरुवात सकाळी ८ ते ९ या वेळेत स्मिता व ज्ञानेश्वर दामोदर वाळुंज पाटील यांच्या हस्ते मूर्ती अभिषेकाने होणार आहे. त्यानंतर सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत समाजप्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे कीर्तन होणार आहे.

परिसरातील माहेरवाशीन भगिनी आणि पैसा-गलठा वस्तीच्या वतीने या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. कीर्तनाला विविध मान्यवर गायक, वादक आणि मृदंगाचार्यांची साथ लाभणार आहे.

दुपारी २ ते ४ या वेळेत माहेरवाशीन भगिनींसह स्थानिक महिलांसाठी हळदी-कुंकू कार्यक्रम होईल. सायंकाळी ७ ते ९ या वेळेत श्री विठ्ठल प्रासादिक भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

वर्धापन दिनानिमित्त भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या रौप्यमहोत्सवी धार्मिक सोहळ्यास परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त ग्रामस्थ पैसा-गलठा वस्ती, लोणी, मुंबईकर मंडळ, पुणेकर मंडळ आणि नवतरुण मित्र मंडळ यांच्या वतीने करण्यात आले आहे.

फटाक्यांच्या कर्णकर्कश आवाजाने प्राणी भयभीत; फटाके फोडणे टाळून दिवाळी साजरी करा, पुणे महापालिकेचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

दिवाळीचा सण म्हणजे आनंद, उत्साह आणि रोषणाईचा उत्सव. मात्र, फटाक्यांच्या मोठ्या आवाजामुळे माणसांसोबतच मुक्या प्राण्यांनाही मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. फटाक्यांच्या कर्णकर्कश आवाजाने प्राणी भयभीत होतात. भीतीपोटी ते सैरावैरा पळू लागतात. यातून त्यांना दुखापत होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्राण्यांना त्रास होईल अशा ठिकाणी फटाके फोडणे टाळून दिवाळी साजरी करण्याचे आवाहन महापालिकेकडून करण्यात आले आहे.

फटाक्यांच्या आवाजामुळे कुत्रे, मांजरी यांसह इतर प्राण्यांमध्ये भीती आणि मानसिक तणाव निर्माण होतो. अचानक होणाऱ्या मोठ्या आवाजामुळे ते घाबरून लपण्याचा किंवा पळून जाण्याचा प्रयत्न करतात. या धावपळीत ते जखमी होऊ शकतात, एखाद्या वेळी समोरच्यावर हल्ला देखील करू शकतात. फटाक्यांच्या आवाजामुळे प्राण्यांच्या तसेच त्यांच्या विश्रांती, खाण्यापिण्याच्या वेळा आणि नैसर्गिक वर्तनावर परिणाम होत असल्याचे पशुवैद्यकीय विभागाच्या मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका भोसले-फुंडे यांनी सांगितले.

विशेषतः वृद्ध, आजारी आणि लहान प्राण्यांसाठी फटाक्यांचा आवाज अधिक धोकादायक ठरू शकतो. तीव्र आवाज व तणावामुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता असते. काही प्रकरणांत हा त्रास जीवघेणाही ठरू शकतो. त्यामुळे फटाके फोडताना प्राण्यांच्या सुरक्षिततेचा विचार करणे आवश्यक आहे. त्यांच्या आसपास फटाके फोडू नयेत. दिवाळीचा आनंद साजरा करताना मुक्या जीवांच्या भीतीची आणि वेदनांची जाणीव ठेवून त्यांच्याप्रती संवेदनशीलता दाखवावी, असे आवाहन महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून करण्यात आले आहे.

प्राण्यांना मारहाण करणे, त्यांच्या शेपटीला फटाके बांधणे, त्यांना जाळणे किंवा जाणीवपूर्वक जखमी करणे ही कृत्ये प्राणी क्रूरता प्रतिबंधक अधिनियम, १९६० च्या कलम ११ अंतर्गत कारवाईस पात्र ठरू शकतात. अशा कृत्यामुळे प्राणी जायबंदी झाल्यास किंवा मृत्यू झाल्यास भारतीय न्याय संहितेच्या कलम ३२५ अंतर्गतही गुन्हा दाखल होऊ शकतो. या कलमानुसार पाच वर्षांपर्यंत कारावास, दंड किंवा दोन्ही शिक्षांची तरतूद आहे. त्यामुळे दिवाळीच्या आनंदात मुक्या प्राण्यांच्या जीवाशी खेळणाऱ्यांविरोधात कायदेशीर कारवाई होऊ शकते. भटक्या श्वानांच्या शेपटीला फटाके बांधून मजा घेण्याची क्रूरता अनेकदा पहावयास मिळते. मुक्या प्राण्यांसोबत गैरकृत्य करणे कायद्याने गुन्हा असून प्राणीहक्क कायद्यानुसार दंड आणि शिक्षेची तरतूद आहे. मात्र केवळ मौज म्हणून त्यांच्या जवळ जाऊन अथवा शेपटीला बांधून फटाके फोडणे हा कायदेशीर गुन्हा तर आहेच, हे क्रौर्याचे लक्षणही आहे, असे डॉ. सारिका भोसले-फुंडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी, महापालिका.यांनी सांगितले.

तुकडे करून धड आणि पाय वेगवेगळ्या ठिकाणी टाकले; दारूच्या नशेत वादातून हत्या, पिंपळे गुरवमधील धक्कादायक घटना

■ दैनिक राज्य लोकतंत्र

कोलकाता / वृत्तसंस्था

पिंपळे गुरव येथील श्रीनगर गल्ली क्रमांक तीनमध्ये कचऱ्यात पुरुषाचे दोन पाय आढळल्याच्या धक्कादायक घटनेचा पोलिसांनी प्राथमिक तपासात उलगडा केला आहे. अनिल खाडे (वय ५०) असे मृत व्यक्तीचे नाव असून, विष्णू कुंभार याने दारूच्या नशेत झालेल्या वादातून हे कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे. मृतदेहाचे धड नवी सांगवीतील विनायकनगर गल्ली क्रमांक एक येथे टाकण्यात आले, तर दोन पाय श्रीनगर गल्ली क्रमांक तीनसमोर टाकल्याचे प्राथमिक तपासातून निष्पन्न झाले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुक्रवारी (६ नोव्हेंबर) सकाळी सुमारे अकराच्या सुमारास काटेपुरम चौक ते रामकृष्ण मंगल कार्यालय रोडवरील श्रीनगर गल्ली क्रमांक तीन येथे रस्त्याच्या कडेला टाकलेल्या कचऱ्यात महापालिकेच्या कर्मचाऱ्यांना पुरुषाचे दोन पाय आढळले. कचरा उचलत असताना हा प्रकार कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आला. त्यांनी तत्काळ पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर सांगवी पोलिसांसह गुन्हे शाखेच्या पथकांनी घटनास्थळी धाव घेतली. अनिल खाडे आणि विष्णू कुंभार यांच्यात दारूच्या नशेत बाचाबाची झाली. या वादातून कुंभार याने खाडे यांची हत्या केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर मृतदेहाचे तुकडे करून धड आणि पाय वेगवेगळ्या ठिकाणी टाकण्यात आल्याचे तपासात उघड झाले आहे.

दरम्यान, संशयित कुंभार हा मानसिक रुग्ण असल्याची माहितीही समोर आली आहे. त्याच्याविरोधात यापूर्वी वाहन चोरीचा गुन्हा सांगवी पोलीस ठाण्यात दाखल असल्याचे समजते. उपायुक्त संदीप आटोळे, साहाय्यक आयुक्त मनीषा कदम, सांगवी पोलिस स्टेशनचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक जितेंद्र कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली १२ तासांच्या आत गुन्ह्याचा छडा लावला आहे. या प्रकरणाचा तपास सांगवी पोलीस आणि गुन्हे शाखेकडून सुरू असून, घटनाक्रम, पुरावे आणि आरोपीची भूमिका याबाबत अधिक तपास केला जात आहे.

पायल मृत्यू प्रकरणाला नवे वळण..! झांबरे यांच्या घरातून ३५ तोळे सोने जप्त; उर्वरित १५ तोळ्यांचा शोध सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पुणे : प्रतिनिधी

हुंड्यासाठी विवाहितेचा शारीरिक व मानसिक छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणात पोलिसांनी झांबरे यांच्या घरातून ३५ तोळे सोने, चांदीचे दागिने, मोबाईल, तसेच मृत पायल हिचा मोबाईल आणि सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी जप्त केले आहेत. दरम्यान, पती, सासू आणि सासऱ्यांच्या पोलिस कोठडीत दोन दिवसांची वाढ करण्यात आली आहे. पती अक्षय अरविंद झांबरे (वय ३५), सासरा अरविंद वसंतराव झांबरे (वय ६८) आणि सासू मंगल अरविंद झांबरे (वय ५८, सर्व रा. मंगलमय, मुकुंदनगर) यांच्या पोलिस कोठडीची मुदत संपत आल्याने त्यांना शनिवारी न्यायालयात हजर करण्यात आले. सरकार पक्षातर्फे ॲड. भाग्यश्री डागळे-संचेती व मूळ फिर्यादी यांच्यावतीने ॲड. पुष्कर पाटील आणि ॲड. ऋतुराज पाटील यांनी युक्तिवाद केला.

विवाहितेच्या मृतदेहाचे ससून रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून, त्याचा व्हिसेरा, दोरी तसेच इतर नमुने रासायनिक विश्लेषणासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. तसेच, गुन्ह्यातील आरोपी अक्षता झांबरे ऊर्फ निमन हिचा पोलिस शोध घेत आहेत. तपासादरम्यान पोलिसांनी आरोपींच्या घरातून ३५ तोळे सोने, चांदीचे दागिने आणि तीन मोबाईल जप्त केले आहेत.



मात्र, गुन्ह्यातील उर्वरित १५ तोळे सोने अद्याप मिळालेले नाही. हे सोने फरार आरोपी अक्षता झांबरे ऊर्फ निमन हिच्याकडे दिले असण्याची शक्यता असून, त्यादृष्टीने तपास करणे आवश्यक आहे. तसेच, फिर्यादीनुसार आरोपींनी पायल हिच्याकडे वेळोवेळी पैशांसह सोन्याच्या दागिन्यांची मागणी केली होती. ही मागणी मंगल झांबरे यांच्या मोबाईलवरून करण्यात आल्याने तो मोबाईल जप्त करणे आवश्यक आहे. मात्र, त्याबाबत आरोपींकडून अद्याप माहिती मिळालेली नाही, असे ॲड. संचेती यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

पायल हिच्या आई-वडिलांनी दिलेले दागिने आणि पैशांतून आरोपींनी कोणती मालमत्ता खरेदी केली आहे का, याचाही तपास करायचा आहे. जप्त केलेल्या मोबाईलचे तांत्रिक विश्लेषण करून त्यातील संभाषणे आणि संदेशांची पडताळणी करणे आवश्यक आहे. तसेच, घटनास्थळावरील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे गुन्ह्याशी संबंधित घटनाक्रम स्पष्ट करायचा आहे. फरार आरोपी अक्षता झांबरे हिचा शोध घेऊन तिला अटक करणेही बाकी असल्याने आरोपींच्या पोलिस कोठडीत वाढ करावी, असा युक्तिवाद ॲड. पाटील आणि ॲड. ऋतुराज यांनी केला.

दरम्यान, गुन्ह्यातील उर्वरित १५ तोळे सोने अद्याप हस्तगत करायचे असून, सासू मंगल झांबरे यांचा मोबाईलही जप्त करणे बाकी आहे. तसेच, फरार आरोपी अक्षता झांबरे हिचा शोध घेण्यासह गुन्ह्याचा सखोल तपास करण्यासाठी आरोपींच्या पोलिस कोठडीत वाढ करण्याची मागणी सरकार पक्षाने केली. त्यानुसार न्यायालयाने पतीसह सासू-सासऱ्यांच्या पोलिस कोठडीत दोन दिवसांची वाढ केली.

सकाळच्या तर्री पोह्यांपासून भाऊबीजेच्या ओवाळणीपर्यंत... शेतकरी कुटुंबात मुख्यमंत्र्यांची दिवाळी!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

ओतूर :प्रतिनिधी

लोहारी सावंगा (जि. नागपूर) - मुख्यमंत्र्यांचा दौरा, सुरक्षेचा ताफा, प्रोटोकॉल आणि अधिकाऱ्यांची लगबग... या सगळ्यांपलीकडे एक माणूस म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी कुटुंबात रमले. ना औपचारिकतेचा बडेजाव, ना पदाचा अभिनिवेश! घरातल्या माणसाप्रमाणे गप्पा, घरच्या चुलीवरच्या जेवणाचा आस्वाद, सकाळी गरमागरम तर्री पोह्यांचा नाश्ता आणि कुटुंबीयांच्या आग्रहाखातर केलेले अभ्यंगस्नान... लोहारी सावंगा येथील रामभाऊ बालपांडे यांच्या घरात मुख्यमंत्र्यांची दिवाळी अक्षरशः घरगुती झाली. या मुक्कामात नात्यांचे बंधही नकळत जुळले. अरुणाताईंनी बहिणीच्या हक्काने मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले आणि, 'दादा, पुढच्या वर्षी वहिनींना घेऊन या', असा आग्रह धरला. त्यांच्या या सहज, प्रेमळ आग्रहाने मुख्यमंत्र्यांच्याही चेहऱ्यावर हसू फुलले.

नरखेड तालुक्यातील लोहारी सावंगा येथे दुष्काळाने होरपळलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांनी दिवाळीची रात्र बालपांडे कुटुंबासोबत घालवली. सायंकाळी भोजनापासून सुरू झालेला हा सहवास दुसऱ्या दिवशी सकाळपर्यंत रंगला. शेतातील पिकांच्या नुकसानीपासून घरच्या माणसांच्या सुख-दुःखापर्यंत अनेक विषयांवर गप्पा झाल्या. मुख्यमंत्रीही अगदी मोकळेपणाने कुटुंबात मिसळले. घरातील महिलांनी स्वतःच्या हाताने बनविलेल्या जेवणाचा आस्वाद घेतल्यानंतर सकाळी नाश्त्याला तर्री पोहे आले. पोहे मला आवडतात. आठवड्यातून किमान चार दिवस नाश्त्याला पोहे असतात, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी घरच्यांशी गप्पा मारल्या. मुख्यमंत्री आपल्याच घरात इतक्या सहजतेने वावरत असल्याचे पाहून बालपांडे कुटुंबीयांचाही आनंद गगनात मावेनासा झाला.

रात्री थंडी असल्याने घराच्या परिसरात शेकोटी पेटविण्यात आली होती. मात्र, मुख्यमंत्र्यांना त्याची कल्पना नव्हती. सकाळी त्याचा उल्लेख करताना, 'तुम्ही मला सांगितले नाही. मीसुद्धा खूप दिवसांनंतर शेकोटीचा आनंद घेतला असता', अशी मिश्कील प्रतिक्रिया त्यांनी दिली. पदाचा कोणताही आव न आणता प्रत्येकाशी आपुलकीने बोलणाऱ्या मुख्यमंत्र्यांचा हा साधेपणा कुटुंबीयांच्या मनाला भावला. मुंबईत राहणाऱ्या रामेश्वरी सावरकर यांच्याशीही त्यांनी मोबाईलवर संवाद साधला. मुंबईत काही अडचण असल्यास नक्की भेटा, असे सांगत त्यांनी कुटुंबातील प्रत्येकाशी नाते जोडण्याचा प्रयत्न केला.

दुसऱ्या दिवशी सकाळी अभ्यंगस्नानानंतर भाऊबीजेचा सोहळा रंगला. अरुणाताईंनी मुख्यमंत्र्यांचे औक्षण केले. घरातील महिलांनी पारंपरिक पद्धतीने ओवाळणी केली. मुख्यमंत्र्यांनीही बहिणीच्या ताटात ओवाळणी घातली. या सगळ्या प्रसंगात औपचारिकतेपेक्षा आपलेपणाच अधिक होता. निरोप घेताना मुख्यमंत्र्यांनी, 'तुमच्यासोबतचा दिवस खूप आनंदात गेला. छान झोप लागली', असे सांगितले. मुख्यमंत्र्यांनी आपल्या घरी मुक्काम केला, एवढेच नव्हे तर घरातल्या माणसाप्रमाणे दिवाळी साजरी केली, ही भावना बालपांडे कुटुंबासाठी अविस्मरणीय ठरली.

पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनीही बालपांडे कुटुंबाशी जवळीक झाल्याचे आवर्जून सांगितले. कुटुंबाने छान आदरातिथ्य केले. दुष्काळाचा फटका बसूनही रामभाऊ यांनी हार मानलेली नाही. कुटुंबातील तीन खातेदारांना कर्जमाफीचा लाभ मिळाला, याचे समाधान आहे. हे कुटुंब वारीला जाते. विठ्ठलाची अर्चना करणारा परिवार विपरीत परिस्थितीतही हतबल होत नाही, असे ते म्हणाले. शेतकऱ्यांच्या व्यथा ऐकण्यासाठी आलेल्या मुख्यमंत्र्यांना या घराने माणुसकीच्या नात्याने आपलेसे केले आणि त्यांनीही त्या आपुलकीला तितक्याच सहजतेने प्रतिसाद दिला.

सात महिन्यांच्या नारायणीची पहिली दिवाळी मुख्यमंत्र्यांसोबत

रामभाऊ आणि अरुणाताईंनी मुख्यमंत्र्यांचे घरच्या सदस्याप्रमाणे स्वागत केले. मुले प्रवीण, अजय आणि सुना राणी, स्वाती यांनी स्वतःच्या हाताने स्वयंपाक केला. कुटुंबातील सात महिन्यांची नारायणी यंदा पहिल्यांदाच दिवाळी साजरी करत होती. तिच्या पहिल्या दिवाळीला मुख्यमंत्रीही उपस्थित होते. 'ती मोठी झाल्यावर आम्ही तिला हा फोटो दाखवू', असे तिचे वडील प्रवीण यांनी आनंदाने सांगितले.

दिव्यांग बांधवांसोबत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दिवाळी; 'नंदनवन'मध्ये स्नेहमेळावा

दिव्यांगांच्या कल्याणासाठी जिल्हा नियोजन निधीतील एक टक्का निधी खर्च करणार; राज्यभर कृत्रिम अवयव वाटपाचा उपक्रम राबविणार

■ दैनिक राज्य लोकतंत्र
मुंबई / वृत्तसंस्था

समाजातील गरजू आणि दिव्यांग बांधवांच्या जीवनातील अडचणी दूर करून त्यांच्या आयुष्यात आशा आणि विश्वासाचा दिवा लावणे, हीच खरी दिवाळी आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष, डॉ. श्रीकांत शिंदे फाउंडेशन, रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्ट आणि आरोग्यदूत फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या 'नंदनवन' या शासकीय निवासस्थानी दिव्यांग बांधवांसाठी दिवाळी स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी दिव्यांग बांधवांसोबत फराळ करून आणि भेटवस्तू देऊन त्यांनी दिवाळीचा आनंद साजरा केला.

'नंदनवन' हे निवासस्थान सर्वसामान्य, गरजू आणि दिव्यांग बांधवांसाठी हक्काचे ठिकाण आहे. दिव्यांग बांधवांमध्ये प्रचंड जिद्द आणि चिकाटी असून त्यांच्या पाठीशी उभे राहणे हे आपले कर्तव्य आहे. आज दिव्यांग बांधवांसोबत दिवाळी साजरी केल्याने खऱ्या अर्थाने सणाचा आनंद मिळाला, अशी भावना शिंदे यांनी व्यक्त केली.

दिव्यांगांच्या हक्कांचे संरक्षण आणि त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी राज्यात स्वतंत्र दिव्यांग मंत्रालय स्थापन करण्यात आले. या माध्यमातून अनेक दिव्यांगांना रोजगाराच्या संधी मिळाल्या असून ते स्वावलंबी होत आहेत. जिल्हा नियोजन समितीच्या एकूण निधीपैकी एक टक्का निधी थेट दिव्यांगांच्या कल्याणकारी योजनांवर खर्च करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

ठाण्यातील टेंभी नाका येथील आनंद आश्रमात आतापर्यंत दीड हजारांहून अधिक दिव्यांगांना कृत्रिम हात-पाय (जयपूर फूट), वॉकर, श्रवणयंत्र आणि अन्य आवश्यक उपकरणांचे वाटप करण्यात आले आहे. या उपक्रमातून दिव्यांगांना स्वावलंबी होण्यासाठी मदत मिळत आहे. हा उपक्रम केवळ ठाण्यापुरता मर्यादित न ठेवता राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये राबविण्यात येणार असल्याची ग्वाही त्यांनी दिली.

जन्मजात हृदयविकार असलेल्या बालकांच्या महागड्या शस्त्रक्रिया तसेच कॉक्लिअर इम्प्लांटच्या माध्यमातून ऐकू आणि बोलू लागलेल्या मुलांच्या कुटुंबीयांसोबतही नुकतीच दिवाळी साजरी केली. या मुलांच्या आणि त्यांच्या पालकांच्या चेहऱ्यावरील आनंदातून वेगळे समाधान मिळत असल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे आवाहन

यंदा दुष्काळामुळे शेतकरी संकटात सापडले आहेत. उद्या जालन्यात शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन त्यांच्यासोबत दिवाळी साजरी करणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी धीर सोडू नये आणि कोणतेही टोकाचे पाऊल उचलू नये. सरकार त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. समाजातील हजारो हातांनीही संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी पुढे यावे.

ही राजकारण करण्याची नव्हे, तर माणुसकीच्या भावनेतून संकटग्रस्तांना आधार देण्याची वेळ आहे, असे भावनिक आवाहन त्यांनी केले.

या स्नेहमेळाव्यामुळे दिव्यांग बांधवांना दिवाळीचा आनंद अनुभवण्यासोबतच सामाजिक आधार आणि आपुलकीचा अनुभव मिळाला.

सारांश वृत्त

संयुक्त राष्ट्रांच्या महत्त्वाच्या समितीवर भारताचा प्रभाव! भारतीय राजनयिक शिवानी गुप्ता यांची तीन वर्षांसाठी निवड

■ दैनिक राज्य लोकतंत्र
न्यूयॉर्क / प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या (UN) महत्त्वाच्या प्रशासकीय आणि अर्थसंकल्पीय समितीवर भारताने आपले प्रतिनिधित्व निश्चित केले आहे. भारतीय राजनयिक शिवानी गुप्ता यांची संयुक्त राष्ट्रांच्या प्रशासकीय आणि अर्थसंकल्पीय प्रश्नविषयक सल्लागार समितीवर (ACABQ) निवड झाली आहे. २०२७ ते २०२९ या तीन वर्षांच्या कार्यकाळासाठी त्यांची निवड करण्यात आली असून जानेवारी २०२७ पासून त्या पदाची सूत्रे स्वीकारतील.

भारताच्या संयुक्त राष्ट्रांतील स्थायी प्रतिनिधी मंडळाने या निवडीची अधिकृत माहिती दिली. शिवानी गुप्ता यांच्या निवडीसाठी विश्वास आणि पाठिंबा दर्शवणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या सर्व सदस्य देशांचे भारताने आभार मानले आहेत.

ACABQ ही संयुक्त राष्ट्रांची महत्त्वाची सल्लागार समिती आहे. संयुक्त राष्ट्रांच्या प्रशासकीय कामकाजाशी संबंधित बाबी आणि अर्थसंकल्पीय प्रस्तावांची छाननी करण्यात या समितीची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे या समितीवरील भारताचे प्रतिनिधित्व आंतरराष्ट्रीय स्तरावर महत्त्वाचे मानले जात आहे.

शिवानी गुप्ता यांचा तीन वर्षांचा कार्यकाळ जानेवारी २०२७ मध्ये सुरू होणार असून २०२९ पर्यंत त्या या समितीवर कार्यरत राहतील.

संयुक्त राष्ट्रांच्या निर्णयप्रक्रियेत आर्थिक नियोजन आणि प्रशासकीय पारदर्शकतेला विशेष महत्त्व असताना भारतीय राजनयिकाची या समितीवर झालेली निवड ही भारताच्या बहुपक्षीय राजनैतिक सहभागाच्या दृष्टीने महत्त्वाची घडामोड ठरली आहे.

राजस्थान भाजपला धक्का! चार वेळा आमदार, माजी मंत्री जसवंत यादव यांचे निधन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
जयपूर / प्रतिनिधी

राजस्थानच्या राजकारणातील ज्येष्ठ भाजप नेते आणि बहरोड मतदारसंघाचे विद्यमान आमदार जसवंत यादव यांचे रविवारी, ८ नोव्हेंबर २०२६ रोजी निधन झाले. ते ७३ वर्षांचे होते. दीर्घकाळ कर्करोगाशी झुंज दिल्यानंतर जयपूर येथे सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाची माहिती त्यांचे पुत्र मोहित यादव यांनी सोशल मीडियावरील पोस्टद्वारे दिली.

जसवंत यादव हे राजस्थान भाजपमधील अनुभवी आणि ज्येष्ठ नेत्यांपैकी एक होते. त्यांनी चार वेळा आमदार म्हणून विधानसभेत प्रतिनिधित्व केले होते. त्याचबरोबर अलवर लोकसभा मतदारसंघातून खासदार म्हणूनही त्यांनी काम पाहिले होते. राज्याच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून जबाबदारी सांभाळताना त्यांनी राजस्थानच्या राजकारणात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली होती.

बहरोड विधानसभा मतदारसंघातून ते भाजपचे प्रतिनिधित्व करत होते. विधानसभा आणि लोकसभा अशा दोन्ही स्तरांवर काम करण्याचा त्यांना प्रदीर्घ राजकीय अनुभव होता. त्यामुळे त्यांच्या निधनामुळे राजस्थान भाजपमधील एका अनुभवी नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे.

गेल्या काही काळापासून ते कर्करोगाने त्रस्त होते. उपचार सुरू असतानाही त्यांच्या प्रकृतीत अपेक्षित सुधारणा झाली नाही. अखेर रविवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली.

चार वेळा आमदार, खासदार आणि राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री असा त्यांचा राजकीय प्रवास राहिला. त्यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर राजस्थानच्या राजकीय वर्तुळातून शोक व्यक्त केला जात आहे. राजकीय कारकिर्दीतील अनेक चढ-उतार अनुभवलेल्या जसवंत यादव यांच्या निधनाने राजस्थानच्या राजकारणातील एका ज्येष्ठ पर्वाचा अंत झाला आहे.

दिवाळीत दिल्लीचा श्वास कोंडला! हवेचा गुणवत्ता निर्देशांक ३७६ वर; फटाक्यांनंतर 'अतिगंभीर' प्रदूषणाचा धोका!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली :प्रतिनिधी

दिवाळीच्या सणाचा उत्साह सुरू असतानाच देशाची राजधानी दिल्ली मात्र विषारी हवेच्या विळख्यात अडकली आहे. दिवाळीच्या दिवशीच दिल्लीतील हवेचा गुणवत्ता निर्देशांक (अटख) ३७६ वर पोहोचला असून हवेची गुणवत्ता 'अतिशय खराब' श्रेणीत नोंदवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, संध्याकाळी दिवाळीनिमित्त फोडण्यात येणाऱ्या फटाक्यांमुळे प्रदूषणात आणखी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. त्यामुळे सोमवारी दिल्लीतील हवेची गुणवत्ता 'गंभीर' श्रेणीत पोहोचण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे.

रविवार, ८ नोव्हेंबर २०२६ रोजी दिल्लीवर धुरक्याची दाट चादर पसरली होती. त्यामुळे अनेक भागांत दृश्यमानता कमी झाली. समीर ॲपवरील आकडेवारीनुसार, जहांगीरपुरी येथे सर्वाधिक ४५० अटख नोंदवण्यात आला, तर आर. के. पुरम येथे ४४८ इतका निर्देशांक होता. ही आकडेवारी राजधानीतील प्रदूषणाची तीव्रता स्पष्ट करते.

प्रदूषणामागे केवळ दिवाळीचे फटाके हेच कारण नाही. वाहनांमधून बाहेर पडणारा धूर, औद्योगिक उत्सर्जन आणि उत्तर भारतातील शेतांमध्ये सुरू असलेले पीक अवशेष जाळण्याचे प्रकार यांचाही प्रदूषणात मोठा वाटा आहे. हिवाळ्याच्या सुरुवातीला वातावरणातील प्रतिकूल परिस्थितीमुळे प्रदूषक घटक हवेतच साचून राहतात.

दिल्लीत प्रदूषण नियंत्रणासाठी महापालिके कडून रस्त्यांवर धुक्याचे फवारे मारणाऱ्या यंत्रांचा वापर केला जात आहे. मात्र, अशा उपाययोजनांमुळे प्रदूषणाच्या मूळ कारणावर कितपत नियंत्रण मिळते, हा प्रश्न कायम आहे.

दिवाळीच्या आनंदावर विषारी हवेचे सावट असताना दिल्लीकरांना आता सोमवारी अधिक गंभीर प्रदूषणाचा सामना करावा लागू शकतो. दरवर्षी प्रदूषणाचा प्रश्न ऐरणीवर येतो; मात्र कायमस्वरूपी उपाययोजनांऐवजी तात्पुरत्या उपायांवरच भर दिला जात असल्याची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. सण साजरा करताना नागरिकांच्या आरोग्याची किंमत मोजावी लागणार का, हा प्रश्न या प्रदूषणाने पुन्हा उपस्थित केला आहे.

भारताला पाकिस्तानकडून तीन विकेट्सने धक्का!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
अल अमिरात, ओमान / प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना म्हटला की चाहत्यांची उत्सुकता शिगेला पोहोचते. मात्र, १९ वर्षांखालील आशिया चषक स्पर्धेत रविवारी (८ नोव्हेंबर २०२६) भारतीय संघाला पाकिस्तानकडून तीन विकेट्सने पराभव स्वीकारावा लागला. भारताने दिलेले २०९ धावांचे आव्हान पाकिस्तानने सात विकेट्स गमावत पूर्ण केले. विशेष म्हणजे, भारताचा फलंदाज अर्जुन राजपूत याने झंझावाती शतक झळकावूनही भारतीय संघाला विजय मिळवून देता आला नाही.

प्रथम फलंदाजी करताना भारतीय संघाचा डाव २०८ धावांवर आटोपला. भारताकडून अर्जुन राजपूत याने सर्वाधिक १०७ धावांची आक्रमक खेळी केली. अवघ्या ८७ चेंडूंमध्ये त्याने हे शतक पूर्ण केले. त्याच्या खेळीत ११ चौकार आणि पाच षटकारांचा समावेश होता. मात्र, एका बाजूने अर्जुनने धावांचा पाऊस पाडला असताना दुसऱ्या बाजूने भारतीय फलंदाजीला अपेक्षित साथ मिळाली नाही. परिणामी भारताला मोठी धावसंख्या उभारता आली नाही.

२०९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानची सुरुवातही अडखळती झाली.



सुरुवातीच्या फलंदाजांना मोठी खेळी करता आली नाही. त्यामुळे सामना भारताच्या बाजूने झुकण्याची शक्यता निर्माण झाली होती. मात्र, सातव्या क्रमांकावर फलंदाजीला आलेल्या हमजा झहूरने संपूर्ण सामन्याचे चित्रच बदलले.

हमजाने १०८ चेंडूंमध्ये नाबाद १०० धावा ठोकत पाकिस्तानला विजय मिळवून दिला. दबावाच्या परिस्थितीत संयम आणि आक्रमकतेचा योग्य समतोल साधत त्याने पाकिस्तानचा डाव सावरला.

अर्जुन राजपूतचे शतक आणि हमजा झहूरचे नाबाद शतक या सामन्याची दोन ठळक वैशिष्ट्ये ठरली. मात्र, भारतीय फलंदाजीची मर्यादित धावसंख्या आणि पाकिस्तानच्या खालच्या फळीतील निर्णायक प्रतिकार यामुळे भारताच्या हातातून विजय निसटला.

एकीकडे शतकवीर अर्जुनची झुंज, तर दुसरीकडे सातव्या क्रमाकावरील हमजाचा विजयशिल्पी खेळ! युवा आशिया चषकातील या सामन्याने भारत-पाकिस्तान क्रिकेटमधील अनिश्चिततेचा पुन्हा प्रत्यय दिला.

पश्चिम बंगालच्या एसआयआर प्रक्रियेला न्यायाधीशांचाच नकार!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
कोलकाता / प्रतिनिधी

पश्चिम बंगालमधील मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेवरून निर्माण झालेला वाद आता न्यायाधिकरणांच्या कामकाजापर्यंत पोहोचला आहे. मतदार यादीतून नावे वगळण्यात आलेल्या नागरिकांच्या अपीलांवर सुनावणी घेण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या न्यायाधिकरणांमधून निवृत्त न्यायाधीशांचे राजीनामे सुरूच आहेत. कलकत्ता उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती बिस्वजित बसू यांनी ७ नोव्हेंबर २०२६ रोजी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिला. ते या प्रक्रियेतून बाहेर पडणारे चौथे निवृत्त न्यायाधीश ठरले आहेत.

यापूर्वी कलकत्ता उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायमूर्ती टी. एस. शिवगणनम, तसेच निवृत्त न्यायमूर्ती रंजित कुमार बाग आणि इंद्रजित चॅटर्जी यांनीही न्यायाधिकरणातून माघार घेतली आहे. सलग चार न्यायाधीशांनी राजीनामे दिल्यामुळे या न्यायाधिकरणांच्या कार्यपद्धतीवर आणि संपूर्ण एसआयआर प्रक्रियेच्या व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

या प्रकरणातील सर्वात गंभीर बाब म्हणजे न्यायाधिकरणांसमोर प्रलंबित असलेल्या अपीलांची संख्या. मतदार यादीतून वगळण्यात आलेल्या नागरिकांची तब्बल ३८ लाख अपिले अद्याप निकाली निघायची आहेत. यासाठी एकूण १९ न्यायाधिकरणांची स्थापना करण्यात



आली आहे. मात्र, या अपीलांचा निपटारा अत्यंत संथ गतीने होत असल्याची तक्रार न्यायाधिकरणांचे प्रमुख असलेल्या न्यायाधीशांनी केली आहे. पश्चिम बंगालमध्ये ऑक्टोबर २०२५ ते फेब्रुवारी २०२६ या काळात एसआयआर प्रक्रिया राबवण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीच्या अगोदर झालेल्या या प्रक्रियेत तब्बल ९१ लाखांहून अधिक मतदारांची नावे यादीतून वगळण्यात आली. हे प्रमाण एसआयआरपूर्वीच्या एकूण मतदारसंख्येच्या सुमारे १३ टक्के होते.

लोकशाहीत मतदानाचा अधिकार हा नागरिकांच्या राजकीय सहभागाचा मूलभूत आधार आहे. अशा परिस्थितीत लाखो नागरिकांची अपिले प्रलंबित असताना न्यायाधिकरणांमधून न्यायाधीशांचे राजीनामे होणे ही गंभीर बाब आहे. मतदारांची नावे वगळण्याची प्रक्रिया वेगाने झाली; मात्र तीच नावे पुन्हा समाविष्ट करण्यासाठी न्यायप्रक्रिया इतकी संथ का, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

ट्रान्सजेंडर महिला म्हणजे महिला नाही? युक्तिवाद हायकोर्टाने फेटाळला!

■ दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिल्ली : प्रतिनिधी

मुंबई : एखादी व्यक्ती जन्मतः पुरुष म्हणून ओळखली गेली असेल, पण ती स्वतःची लैंगिक ओळख महिला म्हणून स्वीकारत असेल, तर कायद्याच्या संरक्षणापासून तिला वंचित ठेवता येईल का? ट्रान्सजेंडर महिलांच्या हक्कांशी संबंधित या महत्त्वपूर्ण प्रश्नावर मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट भूमिका मांडली आहे. ट्रान्सजेंडर व्यक्ती स्वतःची ओळख महिला म्हणून सांगत असेल, तर तिच्यावरील कथित लैंगिक हल्ला आणि महिलेच्या विनयभंगासंदर्भातील गुन्ह्याचे आरोप कायम राहू शकतात, असा महत्त्वपूर्ण निर्वाळा न्यायालयाने दिला आहे. म्हणजेच, केवळ पीडित व्यक्ती ट्रान्सजेंडर आहे, या कारणावरून आरोपीला कायदेशीर कारवाईतून सुटका मिळू शकत नाही.

न्यायमूर्ती मेहरोज पठाण यांनी ३ नोव्हेंबर २०२६ रोजी दिलेल्या आदेशात आरोपी विशाल इंगळे याची आरोपमुक्त करण्याची मागणी फेटाळली. विशेष म्हणजे, आरोपी भारतीय सैन्यात अग्निवीर म्हणून सेवा बजावत होता.

नेमके प्रकरण काय आहे?

आरोपी विशाल इंगळे याच्यावर लग्नाचे आश्वासन देऊन एका ट्रान्सजेंडर महिलेचे लैंगिक शोषण केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात २८ ऑक्टोबर २०२५ आणि ३० ऑक्टोबर २०२५ रोजी कथित अत्याचार झाल्याची तक्रार नोंदवण्यात आली होती. त्यानुसार पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ७५ अंतर्गत महिलेच्या विनयभंगासंदर्भातील गुन्हा, कलम २९६ अंतर्गत अश्लील वर्तनाचा गुन्हा आणि



ट्रान्सजेंडर व्यक्तींच्या हक्कांचे संरक्षण करणाऱ्या २०१९ च्या कायद्यातील संबंधित तरतुदींनुसार गुन्हे दाखल केले.

मात्र, आरोपीने कलम ७५ लागू करण्यालाच आक्षेप घेतला. पीडित व्यक्ती ट्रान्सजेंडर असून ती कायदेशीर अर्थाने महिला नाही, त्यामुळे महिलेच्या विनयभंगाचे कलम लागू होऊ शकत नाही, असा युक्तिवाद त्याच्या वतीने करण्यात आला.

न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळला. लैंगिक ओळख महत्त्वाची; केवळ जन्माच्या आधारावर संरक्षण नाकारता येणार नाही!

न्यायालयाने नोंदवले की, तक्रारदार व्यक्ती स्वतःची ओळख महिला म्हणून करते. आपल्या लैंगिक ओळखीशी सुसंगत शारीरिक बदलांसाठी तिने हार्मोनल उपचारही घेतले होते. एफआयआरमधील आरोपांचा विचार करता, तिच्यावर हल्ला करून तिच्या विनयभंगाचा प्रयत्न केल्याचे प्रथमदर्शनी दिसते. त्यामुळे ती ट्रान्सजेंडर महिला आहे, एवढ्याच कारणावरून भारतीय न्याय संहितेचे कलम ७५ लागू होणार नाही, असे म्हणता येणार नाही.

इतकेच नव्हे, तर ट्रान्सजेंडर व्यक्तींकडे ओळखपत्र नसल्याचा मुद्दाही न्यायालयाने महत्त्वाचा मानला नाही. आरोपीने तक्रारदार महिलेकडे ट्रान्सजेंडर ओळख प्रमाणपत्र नसल्याने २०१९ च्या कायद्यातील कलम १८(ड) लागू होऊ शकत नसल्याचा युक्तिवाद केला होता.

मात्र, ट्रान्सजेंडर व्यक्तीचे संरक्षण करणाऱ्या कायद्यातील कलम २(के) नुसार, व्यक्ती स्वतःची ओळख ट्रान्सजेंडर महिला किंवा पुरुष म्हणून करू शकते. ओळख प्रमाणपत्र मिळविण्यासाठी कलम ५ मध्ये अर्ज करण्याची प्रक्रिया दिलेली आहे. त्यामुळे प्रमाणपत्र नसणे म्हणजे संबंधित व्यक्तीची लैंगिक ओळखच अस्तित्वात नाही, असा अर्थ होत नाही.

या प्रकरणात पीडितेला १२ फेब्रुवारी २०२६ रोजी ओळख प्रमाणपत्र मिळाले होते. कथित घटना मात्र ऑक्टोबर २०२५ मधील आहे. तरीही घटनेच्या वेळी प्रमाणपत्र नसल्यामुळे ट्रान्सजेंडर कायद्यातील दंडात्मक तरतुदी लागू होण्यास प्रतिबंध येत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

न्यायालयाचा निकाल काय सांगतो?

न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवलेले नाही. मात्र, एफआयआरमधील आरोप प्रथमदर्शनी संबंधित कलमांखाली गुन्हा ठरू शकतात, असे निरीक्षण नोंदवून त्याला आरोपमुक्त करण्यास नकार दिला.

हा निकाल केवळ एका फौजदारी प्रकरणापुरता मर्यादित नाही. लैंगिक ओळख, व्यक्तीची प्रतिष्ठा आणि कायद्याचे संरक्षण या मुद्द्यांवर तो महत्त्वाचा आहे. ट्रान्सजेंडर व्यक्तींना समान न्याय मिळवण्यासाठी त्यांच्या ओळखीचा पुरावा म्हणून प्रत्येक वेळी सरकारी प्रमाणपत्राची अट घालता येणार नाही, हा या निकालातून अधोरेखित झालेला महत्त्वाचा मुद्दा आहे.